# प्रकरण २ रे

# आधुनिक मराठी स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप

# प्रकरण दुसरे
# आधुनिक मराठी स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप

मानवी समाज आदिकालापासून स्त्री आणि पुरूष अशा दोन वर्गात विभागला गेला आहे. स्त्रीवादी समीक्षा स्वत:च्या वेगळेपणाचे 'स्व' त्वाची जाणीव ही आजच्या काळातल्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील महत्वाची केंद्रीय संकल्पना आहे 'स्व'त्वाची जाणीव दुहेरी असते. स्व:ताचे इतरांशी असणारे सारखेपणा इतराहून असणारा वेगळेपणा या दोहोंचाही समावेश होतो. " स्त्रियांना स्व त्वाची जाणीव फारशी नसते असलीच तरी ती गमावण्यासाठी असते. 'कॅरोलिन जी.हिलब्रान' म्हणते पत्नीत्वासाठी 'स्व' चा त्याग ही किंमत द्यावी लागते."[१] आरंभीच्या काळामध्ये मानवी समाज भटके जीवन जगत होता त्यावेळी स्त्री – पुरूष विषमता अस्तित्वात नव्हती मानवी जीवनामध्ये परिवर्तन झाल्यावर श्रेष्ठ कनिष्ठ भावना निर्माण होवू लागली. शरीरबलाला प्राधान्या दिल्याने स्त्रीची शारिरीक दुर्बलता पुरूषाच्या लक्षात आल्यानंतर परंपरेने समाज स्त्रीला गौण माणत आला. वंश सातत्य वंश रक्षण याला महत्व येवून उत्पत्तीक्षम वस्तूप्रमाणे स्त्रीवर पुरूषाचा हक्क व ताबा राहून मातृसत्तेऐवजी पितृसत्तेचा उदय झाला.

पाश्च्यात्य देशातील साधारण: अशीच परिस्थिती होती. स्त्रीचे माणुसपण नाकारले अस्तित्व वादी स्त्रीवादामध्ये स्त्रीत्वाची नवी ओळख निर्माण करण्यावर भर दिला. "सिमॉन दि. बोव्हा' यांनी आपण केवळ मनुष्य नसून स्त्रिया आहोत या विचाराला केंद्रस्थानी ठेवून स्त्रीत्वाच्या अस्मितेच्या शोधाला प्राधान्य दिले."[२] स्त्री ही जन्मत:च स्त्री नसते तर समाज व्यवस्था स्त्रीला न्यूनत्वाची भूमीका बहाल करतो. स्त्री ही मुलगी, बहीण, पत्नी, माता या नात्यात गुंतवली गेल्याने तिचे स्वत:चे असतेपण राहत नाही. "खिस्तिनी डेल्फाय' यांनी कुटूंब संस्थेप्रमाणे वर्ग ,जात यामुळे स्त्रीचे दुहेरी शोषण होते."[३] स्त्री – पुरूष नातेसंबंधांना नकार देवून पारंपारिकतेला छेद देण्यासाठी विस्तारीत कुटूंबाचा नवा पर्याय सुचविणारी आशय सुत्रे शोधने हे स्त्रीवादी लेखिकांचे वाड्:मयीन कार्य ठरले. स्त्री–पुरूष प्रेमापेक्षा बहिण – भाऊ, बाप–लेक, आई–लेक, बहिणी – बहिणी यांच्या प्रेमाची पातळी वाढवणे मराठी साहित्यामध्ये प्रिया तेंडूलकर, गौरी देशपांडे, पद्मजा फाटक यांनी स्त्रिच्या 'स्व' त्वाचा हुंकार घेऊन सुसंगत आशय सुत्रातून कथा कादंबरी

लिहिल्या. काही लेखिकांनी पुरूष पात्रांना गौणत्व दिले. स्त्री लिखाणातून स्वत:चे स्वत्व शोधण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांचे साहित्य पुरूषांच्या साहित्यापेक्षा वेगळे असून स्त्री लेखिका व पुरूष लेखक यांच्या लेखणीतील फरक स्त्री समीक्षकांनी घेतलेला दिसतो." स्त्रियांच्या कादंबरीतून, कथातून, कवितातून, स्वत्वाचा शोध त्यांनी कसा घेतला याची जाणीव कशी झाली, वर्षानुवर्षे आपण दडपले गेलो असल्याचे भाव व्यक्त केले याचा शोध घेणारी समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय."[४]

'सिमॉन द बोव्हा' च्या मते, पुरूषांनी निर्मिलेली स्त्री चित्रणे चुकीच्या विपर्यस्त स्वरूपातील असून त्यांचा पाहण्याचा दृष्टीकोन ठरावीक निश्चित केलेले नमुनेच रंगविणे असे असतो. स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून सोडविणे हे स्त्रीमुक्ती चळवळीचे मुख्य कार्य असुन स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास स्त्रीवादी समीक्षा हेच साधन आहे. स्त्री ही एक व्यक्ती असून एक अगम्य गुढ विचार भावना व्यक्त करणारे ते एक अस्तित्व आहे. तिच्या मध्ये असणाऱ्या काही वैयक्तिक व स्वतंत्र वैशिष्ट्यामुळे समाजात एक घटक म्हणून तिला असणारे महत्व मन परिस्थितीला अनुसरून तिने टाकलेले पाऊल, तिची घडलेली मानसिकता, वय , लिंग, तिने चोखळलेला मार्ग तिच्याकडून असलेली अपेक्षा व समाजाने आखुन दिलेली चौकट यातून स्त्रीचे अनुभव विश्व स्वत:साकारत जीवन जगत असते. आणि या सर्व घटना स्त्रियांच्या साहित्यातून अनुभव कोणत्यापध्दतीने व्यक्त होतो ते पाहणे हा स्त्रीवादी साहित्य समीक्षेचा उद्देश असतो.

**स्त्रीवादी साहित्याच्या पाऊलखुणा :-**

अर्वाचीन मराठी साहित्यामध्ये मालतीबाई बेडेकरांनी आधुनिक, सुशिक्षित स्त्रीच्या कोंडमाऱ्याचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे केले आहे. १९७५ च्या 'आंतरराष्ट्रीय महिला हक्कवर्ष'च्या निमित्ताने स्त्री समस्येकडे बघण्याचा जाणीव पुर्वक प्रयत्न झाला आणि त्यातून 'स्त्रीवादी चळवळ' सुरूवात झाली. पाश्च्यात देशात ही चळवळ फ्रेंच लेखिका 'सिमान द बोव्हा' च्या १९४९ मध्ये 'सेकंड सेक्स'पासून सुरूवात झाली. स्त्रीमुक्तीच्या संदर्भात अडथळे निर्माण करणाऱ्या बाबींवर प्रकाश टाकला आणि अनेक मुलभूत प्रश्न उपस्थित केले. पुरूष वर्चस्ववादाचे समर्थन करून स्त्रिला दुय्यम स्थानावर ढकलणारे धर्म विचार, विचारधारा, धर्मगुरू, तत्वज्ञ

आणि शास्त्रज्ञ यांचा धिक्कार केला. धर्म, संस्कृती,तत्वज्ञान, पुरूषसत्ताक समाज रचना आणि कुटूंबव्यवस्था अशा सर्वच पातळीवर स्त्रिला नुसतेच दुय्यम स्थान नव्हते तर तिचे संपूर्ण शोषण या व्यवस्थेतून होत होते. महाराष्ट्रातल्या प्रबोधनकर्त्यांनी हे आव्हान स्विकारून महाराष्ट्रात स्त्रिला माणुस म्हणून जगण्याचे हक्क, आत्मसन्मान, आत्मभान आणि स्वातंत्र्य यांचा उच्चार थेटपणे होऊ लागला. स्त्रिला केंद्रभुत माणून विकासाच्या योजना मांडाव्या एथपासून ते प्रगल्भ स्त्री-पुरूष समाज निर्माण व्हावा यातून ह्या भूमीका पुढे आलेल्या दिसतात. स्त्रीहक्काचे कायदे ,स्त्री शिक्षण, अभिजन, संस्कृतीला स्त्रीवादाच्या रूपाने एक नवे परिमाण प्राप्त झाले. शिक्षित स्त्रिया जीवनाच्या विविध क्षेत्रात कार्यरत होऊन स्त्रिच्या घरातल्या आणि बाहेरच्या अस्तित्वाला नवा अर्थ प्राप्त झाला. समाज स्थितीत बदल झाला असला तरी समाजाची पारंपारिक मनोवृत्ती बदललली नाही साठोत्तरी मराठी साहित्यातल्या स्त्रीवादी वा स्त्रीकेंद्री साहित्याने ज्यात स्त्रीवादी साहित्य या संकल्पनेचा अर्थ स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण आहे आणि जे स्वत्वाच्या जाणीवेणे लिहिलेले असे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. स्त्रीवादी साहित्य या संकल्पनेचा उदय स्त्रीवादी समीक्षेचा उदय या दोन्ही घटना स्त्रीमुक्ती चळवळीशी संबंधीत आहेत. स्त्री ही पुरूष प्रधान समाजात वेगवेगळ्या नात्यांनी गुंतवून ठेवलेली असते. पुरूष आणि स्त्री यांच्यामध्ये फरक केला जावून उच्च स्थान पुरूषाकडे व खालच्या दर्जावर तिला ठेवले जाते. “ही असमानता जीवशास्त्रीय किंवा दैवी नसून नैसर्गीक शारिरीक रचनेमुळे स्त्रिला दुय्यम स्थान दिले जाते. ‘वन इज नॉट बॉर्न बट रादर बीकम्स अ वुमन’ संस्कृती ही या स्त्रीनामक प्राण्याला जन्म देते असे ठासून सांगणाऱ्या सिमॉन द. बोव्हाच्या वैचारिक सिध्दांताचा पाठपुरावा व विकास करणाऱ्या केट मिलेट (सेक्शुअल पॉलिटीक्स) बेट्टी फ्रेडन (द फेमिनाईन मिस्टिक) जर्मेन ग्रीअर (द फिमेल युनक) यांनी ही स्त्री मुक्ती चळवळीला धार आणली.”[५]

मानवजातीच्या इतिहासइतकाच स्त्री जातीवरील अन्याय सनातन आहे. अलिकडच्या काळातील स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याने आपल्याकडे लक्ष वेधून घेतले आहे. स्त्रियांना दुय्यम स्थान दिल्यामुळे स्त्रीवादी चळवळ जोर धरत आहे. संत साहित्यामध्ये तुकारामासारख्या संताने स्त्रीला मातेसमान मानले तरी सामाजिक दृष्टया समान स्थान स्विकारल्याचा निर्देश दिसून येत

नाही. महानुभाव पंथातील 'आद्यकवयित्री महदंबाचे' 'धवळे 'तून स्त्रीवाद दिसून येतो. स्त्रीवादाने आणि स्त्रीसाहित्य समजावून घेताना समाजाच्या इतिहासामध्ये स्त्रिचे स्थान समजून घेणे आवश्यक वाटते. १८४८ मध्ये न्युयार्क येथे 'द फर्स्ट वुमेन्स राईट्स कन्व्हेशन' मध्ये स्त्रियांच्या गुलामगिरी विरूध्द कडक शब्दात चीड व्यक्त केलेली दिसते "१८७९ मध्ये इब्सेन ने आपल्या 'डॉल्स हाउस' या नाटकात 'नोरा' च्या रूपाने स्त्रिला माणुसकीने वागविण्याची जरूरी व्यक्त केली."[६] पुरूषाने निर्माण केलेली सामाजिक व्यवस्था लिंग भावावर आधारीत असून स्त्री-पुरूष यांच्या लैंगिक राजकारणाला बळी पडते.

विभावरी शिरूरकर यांच्या लेखनाचा विचार स्त्रीवादी दृष्टीकोणातून करताना स्त्रीवादाच्या जाणीवा त्यांच्या लेखनातून प्रकट झाल्याचे पाहवयास मिळते. स्त्रीवादी विचार प्रवाहामध्ये वेगवेगळे संप्रदाय निर्माण झाल्याचे सांगून अनिल सपकाळ म्हणतात परंपरा टिकवून परिवर्तन साधण्याची विचार धारा भारतीय स्त्रीवादी चळवळीने आपल्या कृती आणि उत्किृतून स्वीकारली आहे. कुटूंब संस्था ही जाती व्यवस्थेचा परिपाक आहे ही वस्तुस्थिती स्त्रीवादी जाणीवपुर्वक नाकारतात. स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात स्त्री, विशिष्ट अनुभव स्त्रीकेंद्री अनुभव स्त्रीवादी अनुभव या संज्ञा रूढ केल्या समान हक्क, दर्जा, स्वातंत्र्य या स्त्रीवादाच्या मुळ कल्पना सरंजामी युरोपाला धक्का देताना राज्यक्रांतीचे प्रणेते रूसो, बेथंम यांच्या विचारसरणीतून उगम पावलेले दिसतात. समाजातल्या सांस्कृतिक घटनांचा अर्थ लावणाऱ्या लेखिकांनी समकालीन सामाजिक स्थितीतील स्त्रियांच्या संस्कृतीत दडपण कुचंबणेचा अर्थ स्पष्ट करून पुरूष प्रधान व पितृप्रधान व्यवस्थेने केलेले राजकारण केले.सांस्कृतीक दडपणशाही नष्ट करण्यासाठी स्त्रीवादी साहित्याचे आवश्यकता प्रतिपादन केली. आपल्या समाजात स्त्रिच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान हा केवळ हिंदू धर्मातील रूढी परंपरांचा परिपाक असून स्त्रिला जाचक ठरणाऱ्या या रूढी परंपरा नसत्यातर स्त्री पुरूषांच्या बरोबरीने जगले असते. असा आपल्या सामाजिक परिस्थितीतून निष्कर्ष काढणे बरोबर ठरत नाही. जगातल्या अत्यंत प्रगत समजल्या जाणाऱ्या अमेरिका, फ्रान्स सारख्या देशात सुध्दा स्त्रिला स्त्री म्हणून वागवले गेल्याचे चित्र पहायला मिळते. तिथ हुंडा बळी, नसतील पण लग्न, मन:स्ताप, घटस्फोट,एकटेपण, मानहानी, पुरूषाने तिच्यावर

गाजावलेले वर्चस्व या गोष्टी आहेतच. स्त्री शिकली, उच्चपदावर नोकरी करत असली तरी, तिला मिळणारा सन्मान, फक्त तिच्या नोकरीच्याच ठिकाणीच, घरी आल्यावर ती कोणाची तरी पत्नी असते. तेव्हा दुय्यम स्थानावर जगत असते. या बरोबरीच्या स्थानासाठी आपण लढा उभा करायचा म्हणूनच जगातल्या सर्व स्त्रीयांच्यासमोर प्रश्न आहे. याशिवाय एक स्त्री म्हणून विशेष करून आई म्हणून मुले वाढवताना स्त्रियांचे व्यक्तिमत्व विकसीत होत जाते. स्त्रियांच्या स्त्री असण्याच्या गुणवैशिष्ट्यामुळेच त्या विविध क्षेत्रात चांगले काम करू शकतात. किंबहुना जगभरातील हजारो लाखो स्त्रियांनी अनेकानेक क्षेत्रात उत्तम कामगिरी करून दाखविली तरी सुध्दा उच्च पदावर पोहचणाऱ्या स्त्रियांची संख्या आजही कमीच आहे.

**स्त्रीवादी साहित्याच्या प्रेरणा :-**

स्त्रीत्व म्हणजे काय? यात बरीच मते आहेत. पुरूष प्रधान सौंदर्य शास्त्राच्या दृष्टीने विचार करता स्त्रीमध्ये काही गुणांचा अभाव असल्याचे दिसते. ॲरिस्टॉटलच्या मते, 'पुरूषाशी तुलना करता स्त्रीमध्ये जे न्युन असते त्यातच तिचे स्त्रीत्व असते. 'तोरिल मुवा', यांच्यामते 'स्त्री' ' त्च' ही जीवशास्त्रीय वस्तुस्थिती आहे."स्त्रीवादी समीक्षेवर सर्वात जास्त प्रभाव सिमॉन द. बोव्हाचा असून जन्मत:च कोणी स्त्री असत नाही. स्त्रीत्व हे समाजाने संस्कृतीने घडविलेले असते."[७] फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य समतादी कल्पनेतून समान हक्क, समानदर्जा, स्वातंत्र्य या स्त्रीवादाच्या मुळ कल्पना उगम पावल्या स्त्रीवादाची चळवळ मुळात राजकीय स्वरूपाची असून मतदानाचा हक्क ही प्राथमिक पायरी होती. १८७९ मध्ये स्त्रिच्या माणुसपणाची समस्या प्रथम व्यक्त केली. ब्रिटन, फ्रान्स इ. देशांच्या तुलनेले अमेरिकन स्त्रिला आपल्या हक्कासाठी जास्त लढा द्यावा लागला. काळाबरोबरच पुरूषांच्या व्यक्तिमत्वाचा, कार्यक्षेत्राचा विकास झाला तरी शरीर हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र राहीले. स्त्रीवाद्यांच्या मनात काय चालले आहे हे फारसे कळून आले नाही. मुक्ती कोणापासून व कशासाठी हवी ? भारतीय परंपरेत तर अनेकदा स्त्रीच स्त्रीची शत्रु झालेली दिसते. पुरूषाला वगळून साधारणपणे स्त्री राहू शकत नाही.कारण स्त्री-पुरुष हे नैसर्गिक आकर्षण निसर्गानेच निर्माण केले आहे. "डॉ. आश्विनी धोंगडे म्हणतात, 'स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेवून स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या

हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करूण दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले व्यासपीठ आहे'.[८] २० व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीमुक्ती लढ्याला गती मिळाली. स्त्री जन्मत:च स्त्री नसते समाजच तिला स्त्री म्हणून घडवितो या वस्तुस्थितीमुळेच तिच्या मागासलेपणाचे शोषणाचे रहस्य स्त्रीजातीयतेत आहे. साठोत्तरी कालखंडामध्ये स्त्री चळवळी स्त्रीवादी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य विचाराला 'द सेकंड सेक्स' या ग्रंथाने महत्वाचे वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. "स्त्रिच्या व्यक्तित्वाची व निर्णयांची अवहेलना होवू नये यासाठी लोकशाही मुल्यप्रणालीतील समान हक्काची मागणी करून स्त्री – शिक्षण व्यवसाय संचारावर बंदी असू नये हे कायदेशीर हक्काबरोबरच स्त्रीचा तिच्या शरीरावर हक्क असून मातृत्व ऐच्छिक असावे ही स्त्रिच्या अस्मितेची नवी मागणी येवून कुटूंबसंस्था ही स्त्रिच्या व्यक्तित्व विकासातील धोंड म्हणून कुटूंबसंस्थेला नकार द्यावा अशी भूमीका मांडण्यात आली."[९] जीवशास्त्रीय दृष्टीतून स्त्रियांचे अनुभव सृष्टीचे सामाजिक परिमाण प्राप्त झाले. स्त्रीम्हणून जन्माला आल्यानंतर स्त्रियांना जर सर्व क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने वाव मिळाला तर शेक्सपिअरसारखी लेखिका जन्मु शकेल. युरोपमध्ये प्रबोधन युगात मानवी हक्क संदर्भात स्त्रियांच्या हक्काचे प्रश्न आले. फ्रेंच राज्यक्रांतीने हे प्रश्न अधोरेखित केले. स्त्री आणि पुरूष हे दोन्हीही मनुष्यच असून दोघांना समान हक्क द्यावेत हे गृहीतक होते. साठोत्तरी कालखंडामध्ये स्त्रीवादी विचारांचे वेगवेगळ्या अंगांनी भर पडली आणि स्त्रीमुक्तीचा खुला विचारसंच स्त्रीवाद अशी लवचीक व समग्रलक्षी भूमीका पुढे आली.

**स्त्रीवादी साहित्याच्या दिशा :-**

स्त्री ही मुळातच भावनाप्रधान संवेदनशील आणि काहीशी हळवी असते. तिच्या नैसर्गिक प्रवृत्तीतूनच ती आपल्या भावना चटकन व्यक्त करते. स्त्रीने स्वत:ला विविध प्रकारातून व्यक्त करताना मनातील भावभावनांचे कल्लोळ शब्दबध्द केले. दडपलेल्या जाणीवेतून निर्मिती होताना ही निर्मिती तर्कावर आधारीत नसून कल्पनाविलास, भावना, भावूकता यातून निर्मिती झाली. स्त्रीवादी साहित्याची दिशा यांचा विचार मराठी साहित्यात दोन दशकात विशेषत्वाने होत असल्याचे दिसते. पाश्चिमात्य साहित्य क्षेत्रात हा अभ्यास त्याआधी दोन दशके जोमाने बहरतो

आहे. असे वाटते. प्राचीन लोकसाहित्यातील स्त्रीगीते, स्त्रीसंतांचे साहित्य, मौखिक परंपरेने चालत आलेले गद्य, पद्य साहित्यातून स्त्रियांच्या लेखनाच्या संरचना दिसतात. स्त्रियांना साहित्य निर्मितीसाठी भाषिक अवकाश संतांनी उपलब्ध करून दिले.१३ व्या शतकातील महदंबा, जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा यांचे कार्य अलौकीक आहे. स्त्रियांचा शिक्षण क्षेत्रातील सहभाग हे स्त्रीवादी साहित्याचे महत्वाचे कारण आहे."२० व्या शतकात 'आयन् वॅट' ने लिहिलेल्या कादंबरीच्या इतिहासात स्त्रियांच्या कादंबरी लेखनाची बोळवण एका वाक्यात केली. "१८ व्या शतकातील अधिकांश कादंबऱ्या स्त्रियांनी लिहिल्या', या वाक्याशिवाय त्या कालखंडातल्या लेखिकांचा उल्लेख केला नाही."[१०] असमान पायावरचे नाते नाकारल्यावर व्यक्ति म्हणून स्वत:चा शोध घेताना स्वत्वाचे भान ठेवून आत्मसामार्थ्याचा शोध घेणे अंगी असलेल्या क्षमतांचा वापर करणे पुरूषाप्रमाणे स्वायत्ता व स्वातंत्र्य मिळवणे असा अर्थ नसून पुरूषांच्या व्यक्तिगत उदाहरण म्हणून पुरूष हाच आदर्श स्त्रीपुढे ठेवला. त्यांनी विकसीत केलेले वाङ्:मयीन घाट प्रतिमा शब्दार्थ याच्या पलीकडे जावून शोध घ्यावा असे आव्हान पुढे केले. पितृसत्ता राज्यकारणाने स्त्रीला मुख्य प्रवाहापासून अलग ठेवून बौध्दिक व शारिरीकदृष्टया कमजोर व तिच्या सौरक्षणासाठी पुरूष स्वामीत्वाची गरज भासवली गेली. दुय्यमत्व नाकारून स्त्रीपुरूष समानतेची मागणी करून स्त्रीवादी भूमीकेच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय वर्षाच्या निमित्ताने १९७५ पासून चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली १९४७ नंतर स्त्रिया स्त्रिवर लिहू लागल्या. प्रामुख्याने गेल्या पिढीतील स्त्री कवियत्री म्हणून इंदिरा संत, संजीवनी मराठे, शांता शेळके, अनुराधा पोतदार यांच्या साहित्यातून स्त्रीची व्यक्तित्ववादी भूमीका पुर्णपणे नवीन असल्याचे दिसते. रविकिरण मंडळाच्या परंपरेशी नातं सांगणारी भाववादी वृत्ती स्त्री चित्रणात दिसते काळाची पावले ओळखून साहित्यातील शाखांचे रूप बदलू लागले. स्त्री कुटूंबातल्या स्वत:च्या स्थानाचा विचार करू लागली. व्यक्ति स्वातंत्र्याच्या भूमिकेतून स्त्रिया विचार करताना कुटूंबातील व समाजातील स्थान लेखनीतून प्रकट होऊ लागली. आनंदीबाई किर्लोस्कर, कुसुमावती देशपांडे, गीता साने, मुक्ताबाई दिक्षित, कमलाबाई टिळक, विभावरी शिरूरकर यांच्या लेखनाचा विचार स्त्रीवादी दृष्टीकोनातून करताना स्त्रीवाद्यांच्या जाणीवा त्यांच्या लेखनातून प्रकट झाल्याचे पहावयास मिळते. स्त्री विशिष्ट अनुभव, स्त्री केंद्री

अनुभव, समान हक्क, समान दर्जा,हक्क,आणि स्वातंत्र्य हे सर्व जाणिव जागृतीमध्ये दिसून येते. स्त्रियांचा आत्मसन्मान जपणारे आचार विचार आणि उच्चार स्वातंत्र्याचा आदर करणारे साहित्य मानले जाते. स्त्री जीवन समजून घेण्यासाठी स्त्रियांनी आपल्यावरील दडपणूक,अन्याय याचे वर्णन करण्यासाठी आत्मचरित्रे लिहिली. स्वत:च्या अंतकरणात डोकवण्यासाठी सामाजिक परंपरेच्या चौकटी व्यक्ति स्वातंत्र्याच्या प्रभावाखाली मोडण्यासाठी आत्मचरित्रातून स्व:ताच्या व्यक्तित्वाचे दर्शन घडविले. "पाश्च्यात्य वाङ्:मयाच्या इतिहासाने दुर्लक्षिलेल्या स्त्रियांच्या साहित्याचे संशोधन व्हर्जिनिया वूल्फ,एलेन,शोवॉल्टर, एलन मोएर इ. लेखिकांनी केले. मराठीमध्ये तारा भवाळकर,कुमुद पावडे यांनी लोकगीतांचे संशोधन केले."[११] " स्त्रीची एक विशिष्ट संस्कृती असते. काही सामाजिक संदर्भामध्ये स्वत:चे मन, शरीर, भाषा यातून संस्कृती प्रकट होते. स्त्रियांच्या लेखनातून, विषयातून, वाङ्मयबंधातून, अनुभवातून, शैलीतून, भाषेतून, संस्कृती व्यक्त करते. लेखनातील वेगळेपणाचा शोध घेते. स्त्रियांच्या लेखनाचा विचार शोवॉल्टरने केला."[१२] स्त्रियांच्या विशिष्ट प्रतिमा पुन्हापुन्हा आवर्तित होताना कशा दिसतात याचा अभ्यास करणे हा स्त्रीवादी समीक्षेचा भाग असतो. स्त्रीचे साहित्य पुरूष लेखकाच्या साहित्यापेक्षा वेगळे असून रा.भा. पाटणकरांनी कमल देसाईच्या कथा विश्वाचा शोध घेतला. 'स्त्रीयांचे काही अनुभव कसे विशिष्ट असू शकतात' त्या संदर्भात गौरी देशपांडे यांची 'मध्य लटपटीत' विजयाराजाध्यक्ष 'काळ'ही कथा आशा बघे,अंबिका यांच्या 'नणंद – भावजय' 'सासू – सुन' यांच्यातील नाती व्यक्त करणाऱ्या कादंबरींचा उल्लेख करावासा वाटतो. डॉ.विद्युत भागवतांनी स्त्रीवादाची व्याप्तीमध्ये 'खाजगी,सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर होणाऱ्या स्त्रियांच्या दडपणुकीबद्दल जाणीव विरूध्द झगडण्याची तयारी स्त्री विशिष्ट अनुभव मांडणे म्हणजे स्त्रीवादी साहित्य नसून पुरूष प्रधान चौकटीतून मुक्त होण्यासाठी सर्वदास्यशृंखलेतून मुक्त होवून स्त्रीत्वाच्या अस्मितेचा अनुभव संघटित करून लिहिलेले साहित्य हेच स्त्रीवादी साहित्य होय'. स्त्रीच्या जीवनाची घडन ज्या संस्काराने झाली त्याचे प्रतिबिंब आत्मकथनातून प्रकट केले. स्वतंत्र घडण आशा–आकांक्षा, राग – लोभ, कर्तृत्वाची अंगे आढळून येतात. जीवनाकडे काळवंडलेल्या नजरेने न पाहता आशावादीत्वाचा किरण घेवून वाटचाल

करत असलेल्या लक्ष्मीबाईंची स्मृतीचित्रे दिसतात. स्त्री जीवनाचा विशिष्ट नमुना दाखविण्याचा सुसंघटीत प्रयत्न व्यापक जाणीव सर्व क्षेत्रामध्ये समानता पुरूषसत्ताक संस्कृतीत बदल करण्यासाठी स्त्रीवादी साहित्याला दिशा मिळू लागली. सुमा करंदीकरांनी 'रास' पुस्तकात जीवनदर्शन घडविले. परंपरागत वाङ्मयप्रकारातील आत्मचरित्र ही शाखा निवडून जीवनातील घटना प्रसंग सांगितले. 'बहिणाबाई चौधरी' या अशिक्षित कवयित्रीपासून आजपर्यंतच्या कवयित्रींनी स्त्री मनाच्या भाव छटा व्यक्त केल्या आहेत.

स्त्रीमुक्ती आणि स्त्रीवाद याचा खरा अर्थ पुरूषाची बरोबरी करणे नसून स्त्रीने नैतिक कर्तव्य ओळखुन स्वत:ला जाण करून भानावर येणे. त्याच बरोबरीने पुरूषालाही त्याच्या कर्तव्याची जाण व भान देणे. पुरूषी विचार आधंळेपणाने स्वीकारूण स्त्रीत्व संपवूण टाकण्याचा घातकी विचार स्त्री म्हणून नाकारणे आहे. सामर्थ्य, मर्यादा मान्य करून स्त्रीने पुरूषाचा, पुरूषाने स्त्रीचा सन्मान राखणे हाच खरा मानवता वाद आहे आणि त्याचेच प्रतिबिंब साहित्यामध्ये पडलेले दिसते. गौरी देशपांडे यांनी आपल्या साहित्यात पुरूष पात्रांना जाणीवपुर्वक गौणत्व दिलेले दिसते. पुरूषपात्रांना प्रसंगी नामे न देता केवळ सर्वनामाचा वापर करून त्यांच्या अस्तित्वाचे दुय्यमत्व आपल्या साहित्यात रेखाटले आहे. त्यांच्या कथेतले प्रियकर 'बिनचेहऱ्याचे प्रियकर' म्हणून संबोधले गेले. त्यांनी आपल्या साहित्यातून विवाहसंस्था व कुटूंबसंस्था यांचा प्रतिवाद केला. स्त्रीवादी साहित्य विचारातून स्त्रीच्या आत्मशोधाचा विचार आणि स्त्रीत्वाच्या अस्मिता प्रस्थापणेचा प्रवास स्पष्ट होतो. स्त्रीत्वाच्या सर्जकतेचा विचार साहित्यामध्ये वैशिष्ट्य पुर्ण अनुभव क्षेत्र असते. मानसिक अवस्थांतरणाशी असणारा जैवीक संबंध यांचे वर्णन असते. पुराण कथांची नव्याने मांडणी करून स्त्री शोषणाच्या, पुरूषसत्ता दृष्टीकोणाकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न आशा दामले व रोहिणी कुलकर्णी यांनी आपल्या साहित्यातून केलेला दिसतो. लोककथा, लोकगीते यांचा कलात्मक उपयोग आशा बगे, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, प्रतिमा इंगोले यांनी साहित्यकृतीतून केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये काशीबाई कानिटकर, शांताबाई नाशिकर, मुक्ताबाई दीक्षित, कृष्णाबाई मोटे, मालतीबाई बेडेकर यासारख्या स्त्रियांनी स्त्रीयांचे विश्व आपल्या साहित्यातून प्रकट केले. मालतीबाईंनी' बळी',' शबरी', यासारख्या समाजविश्लेषण

करणाऱ्या कादंबरी लिहून प्रगल्भ प्रतिभेचे दर्शन घडविले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. सरोजिनी नायडु, कमलादेवी चटोपाध्याय, अरूणा असफअली या स्त्रियांनी नेतृत्वशक्तीचे प्रदर्शन केले. 'स्मृतीग्रंथ' नी अतिशय कडक निर्बंध लादले असताना सामाजिक परिस्थिती प्रतिकुल असताना भारतीय स्त्रियांनी आपापल्या काळात महत्वाच्या घडामोडीमध्ये भाग घेतलेला दिसतो. १९७५ ते ८५ च्या दरम्यानं स्त्रियांचे प्रश्न ऐरणीवर आले. महिला दशकामध्ये जगातील सर्व देशात महिला कल्याणाच्या योजना आखण्यात येऊ लागल्या. चर्चासत्रे, परिसंवाद, परिषदा, कार्यशाळा आणि व्याख्याने यांचा भडीमार सुरू झाला अनेक पत्रिका निघाल्या, पुस्तके प्रकाशित करण्यात आली. प्रसार माध्यमांचा उपयोग करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने पुढे महिला विषयक धोरण निर्धारित केले. जागतिक महिला परिषदांनी स्त्रीमुक्ती चळवळीला चांगलीच चालना दिली. स्त्रीवादी साहित्य सर्व देशात निर्माण होऊ लागली. देशातील स्त्रीवर्ग हा विविध जाती धर्मात आणि निरनिराळ्या सामाजिक स्तरात विभागला गेला आहे आणि म्हणून त्या त्या जातीधर्मातील त्या त्या सामाजिक स्तरातील स्त्रियांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. मध्यमवर्गातील स्त्रियांचे प्रश्न हे दलित समाजातील स्त्रियांच्या प्रश्नापेक्षा वेगळे आहेत. नागरी विभागातील प्रश्न हे ग्रामीण भागातील प्रश्न वेगळे असतात. शेतकरी, शेतमजुर, कष्टकरी वर्गातील स्त्रियांचे प्रश्न वेगळे आहेत. उच्च वर्गातील व कनिष्ट वर्गातील स्त्रियांचे प्रश्न सारखे नसलेले आढळते. वंचित आणि शोषित वर्गातील स्त्रियांना सामाजिक छळाबरोबर लैंगिक छळाला तोंड द्यावे लागते. कौटुंबिक छळाला स्त्रियांना तोंड द्यावे लागते. हे प्रश्न सर्व प्रश्न हळूहळू मराठी साहित्यात शास्त्रबध्द होत असताना दिसते. 'बायजा', ' मिळून साऱ्याजणी', 'ललकारी' इत्यादी नियतकालिकातून स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली जात आहे.

## निष्कर्ष :-

समाजाची मानसिकता जोवर स्त्रीकडे माणुस म्हणून पाहण्याइतपत बदलत नाही तोवर साहित्यातही 'स्त्री' चे रूप प्रकट होत राहणार. कहाण्यांमधून प्रामुख्याने स्त्री - जीवन व्यक्त होते. या कहानीत सद्वर्तनाचा संस्कार करणाऱ्या असल्यातरी त्यातली स्त्री सदैव दुखा:ने ग्रासलेली असते. ते दु:ख व्यक्त करण्यासाठी कथालेखन होऊ  लागले. कमल देसाई यांनी

नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्यांवर आपल्या कथामधून प्रकाश टाकला. समाजाशी फटकून वागणाऱ्या, भावनिक कोंडी त्यांनी कथातून व्यक्त केली. सानिया यांच्या कथांतून कौटूंबिक नातेसंबंधाचे पदर उलगडताना उर्मिला पवार यांनी दलित कथांमधून कष्टकरी स्त्रीचे प्रश्न, तिचे शोषण यांचे चित्रण केले. सरोजिनी बाबर, अनुराधा गुरव, प्रतिमा इंगोले यांनी निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या ग्रामीण स्त्रियांच्या व्यथा, त्यांच्या समजुती, गैरसमजुती, त्यांची कुटूंब व्यवस्था, त्यांच्या अंधश्रध्दा यांचे दर्शन आपल्या कथामधून घडविले आहे. दुर्गा भागवत, मृणालिनी देसाई, विजया जहागिरदार यांनी पौराणिक, ऐतिहासिक स्त्रियांच्या व्यक्तिरेखा रंगविल्या शकुंतला परांजपे, शकुंतला बोरगावकर, इंद्रायणी सावकार, मंगला गोडबोले यांनी विनोदी मिष्किल शैलीत भाष्य करून हल्लीच्या स्त्रिया ज्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांचे दर्शन घडविले आहे. स्त्रियांचे स्वयंभू व्यक्तिमत्व रेखाटताना नायिका स्वत:कडे समाजाकडे निखळ दृष्टीने पाहणारी आहे. व्यक्ति म्हणून महत्व देताना स्त्रीचे उद्ध्वस्तपण, घटस्फोटापर्यंत येण्याची मानसिकता गौरी देशपांडे व प्रिया तेंडूलकर यांच्या लेखनातून प्रकट केले आहे.

परंपरेची चौकट मोडून स्वत:ला मुक्त करून स्वत:चा स्वत: नव्याने शोध घेऊन नव्या युगाला सामोरे जाण्याची तयारी जुन्या काळातले प्रश्न सोपवून स्वत:चीच नव्याने ओळख करण्यासाठी अनुभवाकडे तटस्थपणे पाहून संवेदनशील, सहृदय मनोवृत्तीचा वापर करून लेखिकांनी वेगळ्यावाटा निर्माण केल्या. स्त्रिची सांकेतिक चित्रेही आढळतात. लेखिकांनी घडविलेल्या नायिका, निरपराध, सोशिक, दुर्दैवी, समंजस अशा होत्या. पण खरी गोष्ट मात्र जे स्त्रियांना जाणवेल, बोचेल व जे पुरूष लेखकाला शोधूनही सापडणार नाही असा अनुभव स्त्रियांनी व्यक्त केले.

# संदर्भ-सूची


१) ग. रा. भटकळ — वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, (कादंबरी)
हर्ष भटकळ, जी.आर. भटकळ.
फाऊ ण्डेशन ३५/सी.पं.मदनमोहन मालवीय मार्ग.
मुंबई ४०००३४. पृष्ट ४११.

२) संपा. डॉ. मनोहर जाधव — समीक्षेतील नव्या संकल्पना.
स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
पहिली आवृत्ती, मार्च २००१. पृष्ट १३२.

३) वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश, (कादंबरी) उ.नि. पृष्ट ४११.

४) तत्रैव, पृष्ट ४१२.

५) डॉ. अश्विनी धोंगडे — स्त्रीवादी समीक्षा (स्वरूप आणि उपयोजन).
दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११०३०, पृष्ट १६६.

६) तत्रैव, पृष्ट ८.

७) तत्रैव, पृष्ट १२६.

८) स्त्रीवादी संकल्पना व मराठीतील व स्त्रीवादी साहित्य विशेषांक पृष्ट ४४.

९) समीक्षेतील नव्या संकल्पना, उ.नि. पृष्ट १२७.

१०) डॉ. अश्विनी धोंगडे — स्त्रीवादी समीक्षा (स्वरूप आणि उपयोजन).
दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११०३०, पृष्ट ६२.

११) वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, (कादंबरी) उ.नि. पृष्ट ४११.